ज्ञानवर्धिनी संस्थेचे

# सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूर

## महिला विकास कक्ष

---

## ‘क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती’

उपक्रमांतर्गत

## ‘ग्रंथ प्रदर्शन आणि ऑनलाईन प्रश्नमंजुषा’

## अहवाल

गुरुवार, दि. ०३ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता **अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, महिला विकास कक्ष (WDC) आणि ग्रंथालय विभाग** यांच्या संयुक्त विद्यमाने **‘क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती’उपक्रमांतर्गत ‘ग्रंथ प्रदर्शन आणि ऑनलाईन प्रश्नमंजुषेचे’ आयोजन करण्यात आले.** या उपक्रमाच्या आयोजनाची उद्दिष्ट्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन, विचार व कार्याची सखोल माहिती पोहोचवणे, स्त्री शिक्षण, स्त्री सक्षमीकरण व सामाजिक सुधारणांतील सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाची जाणीव निर्माण करणे आणि ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून वाचन संस्कृती, संदर्भ व अभ्यासवृत्ती वाढीस लावणे ही होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.अनिल सिंह यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला विकास कक्ष समन्वयक डॉ. सीमा परटोले यांनी केले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती या मंगलमय दिनाचे औचित्य साधून महिला विकास कक्षाच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अनिल सिंह यांच्या शुभहस्ते करण्यात आले. ‘क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले ’यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन महिला विकास कक्षात भरविण्यात आले होते. महाविद्यालयातील एकूण ११ प्राध्यापक आणि ४७ विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली. ‘क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : जीवन व कार्य’ या विषयावरील ऑनलाईन प्रश्नमंजुषेमध्ये महाविद्यालयातील एकूण ६७ विद्यार्थी सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

सदर ग्रंथ प्रदर्शन आणि ऑनलाईन प्रश्नमंजुषा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अनिल सिंह, उपप्राचार्य डॉ. एस. गायकवाड, IQAC समन्वयक प्रो. डॉ. एस. वाघमोडे, WDC समन्वयक डॉ. सीमा परटोले, WDC सदस्य डॉ. अश्विनी ओव्हाळ, प्रा. निशीगंधा जगे, प्रा. अर्चना घनघाव, प्रा. सरला कातकाडे, प्रा. स्वाती फर्डे, प्रा. मोनिका बांगर आणि प्रा. स्वाती जाधव यांनी विशेष मेहनत घेतली. या स्पर्धेच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.स्वाती जाधव यांनी केले. मराठी विभागातील सहाय्यक प्रा. बंडू बिन्नर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली.